**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
पिंपरी-४११०१८, लेखा विभाग
क्रमांक/लेखा/७८/कावि/ १० /२०१७
दिनांक : १६/०३/२०१७

परिपत्रक,

**विषय :- Online EMD/PSD Refund बाबत....**

Online EMD/PSD परतावा करणेकामी संगणक प्रणालीमध्ये योग्य तो बदल माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत करण्यात आलेला आहे. त्यानुसार काही बिले ECS द्वारे या विभागामार्फत अदा करण्यात आलेली आहेत. परंतू सद्य:स्थितीत संबंधित विभागाकडून निविदा अनामत रकमेचा परतावा करताना ईसीएस द्वारे करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

सबब, सर्व निविदा विभागांना कळविण्यात येते की दि.१/०४/२०१७ पासून, सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षापासूनची निविदा बयाणा, अनामत व PSD व ठेकेदारांचे बिलामधून राखून ठेवलेली अनामत रक्कमेचा परतावा हा फक्त ईसीएस द्वारेच अदा करण्यात येणार असल्याने ईसीएस व्यतिरिक्त अनामत परताव्याची बिले लेखा विभागाकडे स्विकृत करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. याबाबत काही अडचणी असल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क करण्यात यावा.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रति,

स्थापत्य विभाग, पाणीपुरवठा विभाग, विद्यूत विभाग , वैद्यकीय विभाग , मध्यवर्ती भांडार, मध्यवर्ती औषध भांडार, उद्यान

इतर सर्व संबंधित विभाग..................................

प्रत :- माहिती व तंत्रज्ञान विभाग
उपरोक्तप्रमाणे दि. १/०४/२०१७ पासून बयाणा परतावा ईसीएस द्वारे अदा करणेकामी कार्यवाही करावी.